ePaper

# पुण्यात MNGL पाईपलाईन लिक झाल्याने भीषण स्फोट!



| वर्ष - 6 । अंक - 269 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शुक्रवार, दि. 13 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- आमदार नितेश राणे यांच्या निषेधार्थ नारायणगावात आंदोलन
- पिंपरी-चिंचवडमध्ये आता "जल्लोष शिक्षणाचा"
- काँग्रेसचे उमेदवार सुधीर तांबेंची पदवीधर निवडणुकीतून माघार

## » आयुक्त शेखर सिंह इज किंग...

# फ्लॉवर नहीं फायर है!

## » पिंपरी-चिंचवडकरांच्या सुरक्षेची जबाबदारी माझी : ऑप्टिकल फायबर नेटवर्कच्या कामाला मंजुरी



**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

आतंकवादी कनेक्शन, दहशतवादी कारवायांशी संबंधित कंपनी आणि शहराच्या सुरक्षा धोक्यात अशाप्रकारणे रान पेटवून प्रशासन आणि आयुक्त म्हणजे 'देशद्रोही' अशी नकारात्मक वातावरण निर्मिती करुन पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने राबवलेली ऑप्टिकल फायबर नेटवर्क कंपनीच्या कामाला अखेर महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मंजुरी दिली. याबाबत गुरुवारी पत्रकार परिषद घेवून अधिकृत माहिती देण्यात आली. काही प्रसारमाध्यमांमधून ऑप्टीकल केबल नेटवर्कच्या कामाबाबत अत्यंत चुकीच्या पद्धतीने वृत्तांकन करण्यात आले. याबाबत शेखर सिंह यांनी खंतही व्यक्त केली.

शहरातील नागरिक आणि देशाच्या सुरक्षेबाबतचे आम्हाला गांभीर्य असून, याबाबत ज्यांनी आक्षेप नोंदवले आहेत. त्याची शहानिशा करण्यात आली आहे. हे काम मिळालेली कंपनी मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि. IN CONSORTIUM WITH फायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा. लि. या निविदाधारक कंपनीने किमान आश्वासित वार्षिक महसूलाच्या १०८ % म्हणजेच ३२.४ कोटी व अतिरिक्त उत्पन्नाच्या २१ टक्के महसूल स्मार्ट सिटीला देणेबाबत निविदा सादर केलेली आहे. ही निविदा HIGHEST 1 (H1) म्हणून केली आहे. त्यानुसार, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड मार्फत काढण्यात आलेल्या सिटी नेटवर्क मॉनिटायझेनच्या निविदेसाठी प्राप्त ठरलेल्या मे. सुयोग टेलिमॅटीक्स लिमिटेड या निविदाधारक कंपनीस दि. २३ डिसेंबर २०२२ रोजीच्या स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाच्या २१ व्या बैठकीत मंजुरी दिली आहे. त्याअनुषंगाने कंपनीसोबत वाटाघाटी करून देकार अंतिम करण्यात येवून मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि. IN CONSORTIUM WITH फायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा. लि. यांना LETTER OF INTENT (LOI) दि. १२/०१/२०२३ रोजी देण्यात आला आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

शहराच्या सुरक्षेच्या नावाखाली चुकीच्या पद्धतीने जनमानसात आपल्या प्रशासनाबाबत प्रतिमा करणे, चुकीचे आहे. व्यक्ती आणि कंपनी यामध्ये फरक आहे. ज्या नावांचा आक्षेपांमध्ये उल्लेख केला आहे. त्यांचा आणि कंपनीचा संबंध नाही. कंपनीतील शेअर होल्डर निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करु शकत नाही. त्यामुळे चुकीच्या पद्धतीने आक्षेप नोंदवणे शहराच्या हिताचे नाही, अशा शब्दांत आयुक्त शेखर सिंह यांनी ऑप्टिकल केबल नेटवर्कींग कामाबाबत आक्षेप नोंदवणाऱ्यांना फटकारले आहे. त्यामुळे पत्रकार परिषदेत आयुक्त सिंह म्हणजे 'फ्लॉवर नहीं फायर है'... अशा आत्मविश्वासाने फटकेबाजी करताना पहायला मिळाले.



## आरोपांबाबत आयुक्तांनी केलेला खुलासा...

» सर्वाधिक बोलीचा देकार देणा-या मे. सुयोग टेलिमॅटिक्स लि. IN CONSORTIUM WITHफायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा. लि. यांच्या संदर्भात काही तक्रारी या कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने कंपनीकडून खुलासा मागविण्यात आलेला होता. कंपनीकडून खुलासा व त्या संदर्भातील कागदपत्रे नुकतीच प्राप्त झालेली आहेत. कंपनीकडून प्राप्त खुलाश्यानुसार कंपनीच्या विद्यमान संचालकांची नावे दि. ०४/१२/२०२१ रोजीच्या FIR, CR NO. |-11191011210152 OF 2021 मध्ये नमूद नाहीत. या FIR मध्ये ड्वेन परेरा या व्यक्तीचे नाव नमूद असून FIR दाखल झालेल्या दिनांकास ही व्यक्ती कंपनीच्या संचालक पदावर कार्यरत नसून सदर व्यक्तीने दि. २९/११/२०२१ रोजी संचालक पदाचा राजीनामा दिलेला आहे. तसेच, रियाज अब्दुल अजीज शेख या व्यक्तीचे नाव सदर FIR मध्ये नमूद नाही आणि या व्यक्तीने कंपनी संचालक पदाचा राजीनामा दि. २९/११/२०२१ रोजी दिलेला आहे. कंपनीच्या खुलाश्यानुसार रियाज अब्दुल अजीज शेख याचेकडे कंपनीचे कोणतेही इक्वीटी शेअर्स नाहीत. ड्वेन परेरा याचेकडेही कंपनीचे इक्वीटी शेअर्स नाहीत. परेरा या व्यक्तीकडे कंपनीचे काही प्रेफरन्स शेअर्स आहेत. तथापि, प्रेफरन्स शेअर्स होल्डर यांना कंपनी कामकाजात मताचा अधिकार अथवा कंपनी व्यवस्थापनात कोणताही अधिकार नसतो. या कार्यालयाकडील प्राप्त तक्रारीमधील FIR हा दि. ०४/१२/२०२१ रोजीचा असून रियाज शेख व ड्वेन परेरा यांनी दि. २९/११/२०२१ रोजी कंपनी संचालक पदाचा राजीनामा दिलेला आहे. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने राबविलेली निविदा प्रक्रीया ही त्यानंतरची असून निविदा प्रसिध्दीची दि. ०५/०८/२०२२ रोजीची आहे.

" सदर निविदा प्रक्रिया ही स्पर्धात्मक पध्दतीने आणि अत्यंत पारदर्शीपणे पार पाडण्यात आली आहे. पुढील आर्थिक वर्षापासून स्मार्ट स्मार्ट सिटी कंपनीला केंद्र व राज्य शासनाकडून कुठलाही निधी प्राप्त होणार नसून सदर प्रकल्पामुळे स्मार्ट सिटी कंपनी स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. तसेच, महापालिकेवरील आर्थिक भार कमी होणार आहे. देशातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अशा प्रकारचा प्रकल्प राबविण्यात आलेला नसून या स्वरुपाचा पथदर्शी प्रकल्प देशामध्ये प्रथमच पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मार्फत राबविण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकल्पाला विरोध करण्यापेक्षा त्याचे स्वागत करणे अपेक्षीत होते.

**- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# आ. नितेश राणे यांच्या निषेधार्थ आंदोलन!

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याविषयी अपशब्द, नारायणगावात निषेध

।नारायणगाव ।

महाईन्यूज ।प्रतिनिधी।

खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या विषयी भाजपचे आमदार नितेश राणे यांनी वापरलेल्या अपशब्दा बद्दल त्यांचा निषेध करण्यासाठी जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आज सायंकाळी येथिल पुणे नाशिक महामार्गावर आंदोलन करण्यात आले. या वेळी आमदार राणे यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या.

राणे यांच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. आमदार राणे यांनी एका जाहीर कार्यक्रमात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या विषयी अपशब्द वापरून त्यांचा अवमान केला होता.आमदार राणे यांच्या वक्तव्याचे तीव्र पडसाद जुन्नर तालुक्यात उमटले.आमदार राणे यांच्या निषेधार्थ आमदार अतुल बेनके यांच्या नेतृत्वाखाली आज सायंकाळी येथील पुणे नाशिक महामार्गावर आंदोलन करण्यात आले.आमदार बेनके म्हणाले जनतेच्या मुळ प्रश्नांपासून लक्ष विचलीत करण्यासाठी, समाजात अशांतता निर्माण करण्यासाठी भाजपचे काही नेते बेताल वक्तव्य करत आहेत. महापुरुषांचा अवमान करत आहे. खासदार डॉ. कोल्हे यांनी छत्रपती शिवाजी महाराज , छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास जगासमोर दाखवला. लायकी नसलेल्या आमदार राणे यांनी खासदार डॉ. कोल्हे यांचा केलेला अपमान शिवजन्मभूमीतील जनता सहन करणार नाही.




### राणे यांनी जाहीर माफी मागावी. अन्यथा...

» राणे यांनी जाहीर माफी मागावी. अन्यथा महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा आमदार बेनके यांनी दिला.या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते गुलाबराव नेहेरकर, अमित बेनके,माजी जिल्हा परिषद सदस्य राजश्री बोरकर, अंकुश आमले, मोहीत ढमाले, बबनराव तांबे,सुजित खैरे, दिलीप कोल्हे, माजी सभापती विशाल तांबे, अंजली खैरे यांनी राणे यांच्या निषेधार्थ मनोगत व्यक्त केले. या वेळी संजय वारुळे, गणेश वाजगे, पुष्पा जाधव, तानाजी डेरे, शेखर ढवळे, परशुराम वारुळे, विकास दरेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. सुत्रसंचालन रामदास अभंग , सूरज वाजगे यांनी केले.

---

# पिंपरी कॅम्पात अतिक्रमण कारवाई, व्यापाऱ्यांकडून दुकाने बंद करून जाहीर निषेध

## » व्यापारी आणि अतिक्रमण पथकातील अधिका-यांमध्ये वादावादी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या पिंपरी कॅम्पात अतिक्रम कारवाईवेळी व्यापारी आणि अतिक्रमण पथकाच्या अधिका-यांमध्ये वादावादी झाली. वादावादीचे नेमके कारण अद्याप पुढे आले नाही. दरम्यान, व्यापा-यांनी दुकाने बंद करत कारवाईचा निषेध केला.**

पिंपरी कॅम्प ही शहरातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. कॅम्पातील अतिक्रमणाबाबत सातत्याने तक्रारी असतात. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण पथक आज गुरुवारी कारवाईसाठी कॅम्पात दाखल झाले. कारवाईदरम्यान व्यापारी आणि अतिक्रमण पथकातील अधिका-यांमध्ये काही कारणामुळे वादावादी झाले. त्याचे तीव्र पडसाद उमटले आहेत. व्यापा-यांनी दुकाने बंद करुन कारवाईचा निषेध केला. शगुन चौकात एकत्र येत व्यापा-यांनी कारवाई विरोधात आंदोलन केले. दरम्यान, पोलीसही कॅम्पात दाखल झाले आहेत. माजी नगरसेवक डब्बू आसवाणी, पिंपरी मर्चन्ट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवाणी तिथे दाखल झाले .




» पिंपरी कॅम्प ही शहरातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. कॅम्पातील अतिक्रमणाबाबत सातत्याने तक्रारी असतात. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण पथक आज गुरुवारी कारवाईसाठी कॅम्पात दाखल झाले. कारवाईदरम्यान व्यापारी आणि अतिक्रमण पथकातील अधिका-यांमध्ये काही कारणामुळे वादावादी झाले. त्याचे तीव्र पडसाद उमटले आहेत. व्यापा-यांनी दुकाने बंद करुन

---

# मुश्रीफ यांच्या मालमत्तांवर छापे


।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, आमदार हसन मुश्रीफ यांच्या कागल येथील निवासस्थानांबरोबरच पुण्यातील मालमत्तांवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बुधवारी छापे टाकले. या कारवाईवरून पुन्हा सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत.

'ईडी'ची पथके बुधवारी सकाळीच मुश्रीफ यांच्या कागल येथील निवासस्थानासह पुण्यातील कोरेगाव पार्क आणि बंडगार्डन येथील मालमत्तांस्थळी दाखल झाली. कागलच्या निवासस्थानातून मोठ्या प्रमाणात कागदपत्रे जप्त करण्यात आली. ही कारवाई दिवसभर सुरू होती. याबाबत अधिकाऱ्यांनी भाष्य करण्यास नकार दिला. घराबाहेर बंदूकधारी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या कारवाईवेळी मुश्रीफ हे मुंबईत होते. घरी त्यांची पत्नी आणि साजिद, अबिद व नवीद ही तिन्ही मुले, सुना, नातवंडे असा परिवार होता. मुश्रीफ यांचे समर्थक माजी नगराध्यक्ष प्रकाश गाडेकर यांच्या घरावरही सकाळी छापा टाकण्यात आला. पुण्यातील कोंढवा येथील अशोका म्यूज सोसायटी आणि गणेशिखड रस्त्यावरील मालमत्तांवरही कारवाई करण्यात आली. कोंढवा भागात मुश्रीफ यांचे नातेवाईक राहतात. 'ईडी'च्या पथकाने मुश्रीफ यांच्या नातेवाईकांची चौकशी करून काही कागदपत्रे जप्त केली. मात्र, जप्त केलेल्या कागदपत्रांविषयी अधिक तपशील उपलब्ध होऊ शकला नाही. मुश्रीफ यांचे व्यावसायिक भागीदार चंद्रकांत गायकवाड यांच्या कार्यालयावरही 'ईडी'च्या पथकाने छापा टाकला. गायकवाड यांची चौकशीही करण्यात आली.

हसन मुश्रीफ यांच्या आर्थिक व्यवहारावरून भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अनेक आरोप केले आहेत. याबाबत त्यांनी 'ईडी'कडे तक्रारी केल्या आहेत. त्यानंतर जुलै २०१९ मध्ये कागल येथे व पुणे येथील मुश्रीफ यांच्या निवासस्थानी प्राप्तिकर विभागाने छापा टाकला होता. सोमय्या यांनी आरोप सुरु ठेवल्याने मुश्रीफ यांनी त्यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. नववर्षाच्या सुरुवातीला सोमय्या यांनी ट्विट करून पुन्हा कारवाई होण्याचे संकेत दिले होते.

### राष्ट्रवादीच्या आणखी एका नेत्यावर 'ईडी'ची कारवाई



# पिंपरी-चिंचवडमध्ये आता जल्लोष शिक्षणाचा!

## प्रशासनाचा लक्षवेधी उपक्रम : शिक्षण सुविधा सक्षमीकरण

पिंपरी ।
। महाईन्यूज ।



**पिंपरी-चिंचवड महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक, गुणात्मक तसेच नाविण्यपूर्ण विचार वाढीकरीता विद्यार्थी व शाळा स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. त्याद्वारे शिक्षण विभाग व सिटी ट्रान्सफर्मेशन ऑफीस (CTO) याच्या संयुक्त आयोजनाने जल्लोष... शिक्षणाचा २०२३ ह्या स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, अशी घोषणा महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केली.**

"जल्लोष... क्षिणाचा-२०२३" या स्पर्धात्मक उपक्रमाची माहिती देण्यासाठी गुरूवारी पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी स्मार्ट सिटीचे मुख्याधिकारी किरणकुमार यादव, आरोग्य विभागाचे प्रमुख अजय चारठाणकर, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ आदी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, तीन विविध विषयांवर उदा. शाळा स्पर्धा, विद्यार्थी स्पर्धा व तीन दिवशीय आनंदोत्सन (कार्निवल) आयोजित केला जाणार आहे. त्याअंतर्गत शाळा स्पर्धा, विद्यार्थी स्पर्धा (मनपा व खाजगी शाळांकरीता), आनंदोत्सव (कार्निवल), मंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम, खाद्यपदार्थ स्टॉल्स व गेम झोन इत्यादीचे आयोजन केले जाईल.

पिंपरी - चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत ११० प्राथमिक व १८ माध्यमिक शाळा कार्यरत असून त्यामध्ये जवळजवळ ५७,००० पैक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहे. शालेय विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय शिक्षण देण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करीत आहे. त्या अनुषंगाने शिक्षण विभागाने आकांक्षा फौंडेशन आणि लिडरशिप फॉर स्किल एजुकेशन फौन्डेशन यांच्यासोबत करारनामा केलेला आहे. हया करारनाम्यानुसार इंग्रजी भाषा, फौंडेशनल लर्निंग आणि न्यूमरसी, मुख्याध्यापक व शिक्षक अध्यापन करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मानधनावर शिक्षक भरती व शाळेवर लिपिक कम डेटा एन्ट्री ऑपरेटर नेमणूक करण्याची प्रक्रिया चालू आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये "ई-क्लासरूम" हा प्रकल्प राबविणेत येत असून यामध्ये अत्याधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहोत. सदर प्रकल्पामध्ये विज्ञान, गणित, तंत्रज्ञान, रोबोटिक्स अशा पद्धतीची आधुनिक प्रयोगशाळा विकसित केलेली आहे. तसेच डिजिटल अभ्यासक्रमाचा समावेश करून विद्यार्थ्यांना ॲनिमेशनच्या माध्यमातून शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास होणे हे उद्दिष्ट आहे, असेही आयुक्तांनी सांगितले.

### "क्षमता विकास प्रशिक्षण" शिबीराचे आयोजन...

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि आदित्य बिर्ला एज्युकेशन अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या शाळेतील मुख्याधापक आणि शिक्षकांसाठी "क्षमता विकास प्रशिक्षण" शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर उपक्रमात विज्ञान, गणित, इंग्रजी, समाज शिक्षण, पर्यावरण हया विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत असून त्याचा उपयोग मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी उपयुक्त होणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थांना शाळेची आवड निर्माण करण्याकरिता सर्व शाळांतील इमारतींना त्याचबरोबर वर्गखोल्या, कार्यालय, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालय, मुला-मुलींचे शौचालय तसेच फर्निचर यामध्ये एकसूत्रता येणेकरिता एकाच प्रकारचे, एकाच आकारमानाचे व एकाच रंगसंगतीचे रंग देऊन मनपाच्या शाळा देशात अग्रेसर होण्याच्या दृष्टीने शाळांना स्वतंत्र बोधचिन्ह (लोगो), घोषवाक्य, नाव व एकसारखे दिशादर्शक चिन्ह देऊन शाळांना आकर्षित करीत आहोत, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी**

---

# संत तुकाराम महाराज मंदिर उभारणीसाठी १ कोटी ६० लाखांची मदत

## » दशक्रिया विधीला जनसागर लोटला : दिवंगत आमदार जगताप यांच्या आठवणींना उजाळा

। पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी: पिंपरी-चिंचवडचे लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जाण्यामुळे शहराची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या नसण्यामुळे समाजात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ते जगण्याच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे सात्विक व्यक्तिमत्त्व होते. स्वतःच्या मृत्यूची कल्पना असतानाही जनतेची सेवा करणारे लक्ष्मणभाऊ आम्ही अनुभवले, अशा भावना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गुरूवारी व्यक्त केल्या. यावेळी अनेकांचे अश्रू अनावर झाले होते.

भाजपचे चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना अखेरचा निरोप देण्यासाठी दशक्रिया विधी पार पडला. त्यासाठी पिंपळेगुरवमध्ये हजारोंचा जनसागर लोटला होता. यावेळी आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्र परिवाराच्या वतीने भंडारा डोंगरावर उभारण्यात येणाऱ्या संत तुकाराम महाराज मंदिरासाठी १ कोटी ६० लाखांची मदत देण्यात आली.

आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे ३ जानेवारी रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. गेले नऊ दिवस त्यांच्या कुटुंबियांच्या सांत्वनासाठी पिंपळेगुरव येथील निवासस्थानी राज्यभरातील सर्वपक्षीय नेते तसेच धार्मिक, अध्यात्मिक, कला, सांस्कृतिक, क्रीडा, उद्योग, सामाजिक, बांधकाम अशा सर्व क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट दिली. लक्ष्मणभाऊ जगताप यांना



आदरांजली वाहून कुटुंबियांचे सांत्वन केले. गुरूवारी सकाळी पिंपळेगुरव येथे पवना नदीकाठी दशक्रिया विधी पार पडला. धार्मिक विधी पार पडल्यानंतर पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे सहअध्यक्ष सद्गुरू श्री. गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे प्रवचन झाले. औसेकर महाराजांनी आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या सामाजिक, राजकीय तसेच सात्विक आणि धार्मिक आचरणाचा विशेष उल्लेख करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्र परिवाराच्या वतीने विराज रेणुसे, ऋषीराज सावंत, गिरीराज सावंत यांनी भंडारा डोंगरावर उभारण्यात येत असलेल्या संत तुकाराम महाराज मंदिरासाठी अध्यक्ष बाळासाहेब काशीद पाटील यांच्याकडे १ कोटी ६० लाखांचा धनादेश सुपूर्त केला.

यावेळी सूत्रसंचालन शिक्षण मंडळाचे माजी सभापती नाना शिवले यांनी केले. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे बंधू व भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, विजय जगताप यांनी उपस्थितांचे ऋणनिर्देश व्यक्त केले.

### मान्यवरांची उपस्थिती

**» या दशक्रिया विधीसाठी राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजीराव सावंत, खासदार श्रीरंग बारणे, आमदार व भाजपचे शहराध्यक्ष महेश लांडगे, आमदार संजय जगताप, सुनील टिंगरे, माजी मंत्री बाळा भेगडे, माजी आमदार विलास लांडे, बाळासाहेब शिवरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विनोद बन्सल, दादा वेदक, हभप आचार्य रामकृष्णदास लहवितकर महाराज, हभप पंकज महाराज गावडे यांच्यासह शहरातील सर्वपक्षीय माजी नगरसेवक व नगरसेविका, सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आजी व माजी अधिकारी-कर्मचारी, नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



भाष्य

वैष्णव जाधव,
कार्यकारी संपादक

# “गतीमान कारभार अन् दूरदृष्टीचा विचार”

## आयुक्त शेखर सिंह यांची स्वागतार्ह कार्यपद्धती!

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ही शहराच्या यशस्वी विकासाची चाके आहेत, असे म्हटले जाते. ही दोन्ही चाके संतुलित गतीने चालू लागली, तर शहर विकासाचा संकल्प पूर्णत्वास येवू शकतो. पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी ही बाब निश्चितपणे हेरली असावी. त्यामुळेच राज्य सरकार, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या अपेक्षा आणि शहराचे सार्वजनिक हित या दृष्टीने “गतीमान कारभार अन् दूरदृष्टीचा विचार” या सूत्रानुसार सिंह आपली जबाबदारी पार पाडत आहेत, असे दिसते. पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून सुमारे ५२ वर्षे शहरात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता राहीली आहे. २०१७ मध्ये सत्ताबदल झाला. त्यावेळी महापालिकेत तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डिकर होते. भाजपाच्या सत्ताकाळात हर्डीकरांनी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावले. किंबहुना, समाविष्ट गावांच्या विकासासाठी हजारो कोटी रुपयांचा निधी त्यावेळी तत्कालीन स्थायी समिती आणि महासभेच्या माध्यमातून मंजूर झाला. त्यामुळे शहराच्या चारही भागात विकासाचा समतोल साधता आला. त्याचे श्रेय श्रावण हर्डीकर यांनाच द्यावे लागेल.

एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याच्या हातात शहराचे भले किंवा बुरे करण्याची ताकद असते. श्रावण हर्डीकर यांच्या काळात महापालिकेत आणि राज्यात भाजपाची सत्ता होती. त्यावेळी शहरातील विकासकामांना गती मिळाली. मधल्या काळात कोविड महामारीमुळे विकासकामांवर परिणाम झाला. निधी अभावी अनेक प्रकल्प रखडले. त्यानंतर २०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आली. त्यावेळी महापालिकेत भाजपा आणि राज्यात महाविकास आघाडी असे परस्परविरोधी वातावरण होते.राज्यात आणि महापालिकेत परस्पर विरोधी राजकीय स्थिती असताना महापालिका आयुक्तपदी राजेश पाटील यांची नियुक्ती झाली होती. त्यावेळी राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीच्या मर्जीनुसार, पाटील यांना काम करावे लागले. त्याचाच परिणाम श्रावण हर्डिकरांच्या काळात सुरू झालेली विविध विकासकामे राजेश पाटलांच्या काळात प्रलंबित राहीली किंवा अनेक कामांची तरतूद शून्य झाली. जून २०२२ मध्ये राज्यात सत्ता परिवर्तन झाले. शिंदे- फडणवीस सरकारच्या काळात महापालिका आयुक्तपदी शेखर सिंह यांची नियुक्ती झाली. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार आणि महापालिकेतील प्रशासक राज यामुळे शेखर सिंह यांना लोकहिताची कामे करण्यास पुरेशी ‘स्पेस’ निर्माण झाली. निर्णय स्वातंत्र्य आल्यामुळे लोकाभिभूख निर्णय घेण्यास बळ मिळाले. याच ‘स्पेस’ चा पुरेपूर फायदा घेत शेखर सिंह यांनी श्रावण हर्डीकर आणि राजेश पाटील यांच्या कार्यकाळातील प्रस्तावित कामे मार्गी लावण्याचा धडाका लावला. त्यामध्ये महापालिका नवीन इमारत बांधकाम, यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाई, केबल इंटरनेट नेटवर्क, भामा आसखेड प्रकल्पातील जॅकवेल उभारणी, चिखली जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम यासह विविध रस्त्यांची कामे पूर्णत्वाकडे नेण्याचा सपाटा लावलेला पहायला मिळतो.

शेखर सिंह हे २०१२ च्या बॅचचे अधिकारी आहेत. देश पातळीवर त्यांचा ३०६ वा क्रमांक होता. सिंह हे आयआयटी गुवाहटीचे (इंडियन इन्सिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी) पदवीधर आहेत. त्यानंतर त्यांनी अमेरिकेतील बर्केली येथील कॅलिफोर्निया विद्यापीठातून स्ट्रॅक्चरल इंजिनिअरिंग शाखेची पदव्युत्तर पदवी घेतली आहे. नागपूरचे सहायक जिल्हाधिकारी, रामटेकचे प्रांताधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी म्हणून सिंह यांनी काम पाहिले आहे. सातारा जिल्हाधिकारीपदाचा त्यांचा बराचसा कार्यकाळ करोनामध्ये गेला आहे. त्यांनी करोना महामारीच्या कार्यकाळात चांगले काम केले आहे. याचा अर्थ शेखर सिंह तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डिकर आणि राजेश पाटील यांना ‘ज्युनिअर’ आहेत. त्यामुळे आपल्यापेक्षा अनुभवी अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेली विकासकामे कोणताही मुलाहिजा न ठेवला किंवा राजकीय दृष्टीकोनातून कामांना खोडा न घालता, आपल्या अधिकारांचा लोकहितासाठी वापर करण्याची शेखर सिंह यांची भूमिकेचे पिंपरी-चिंचवडकरांनी स्वागतच करायला हवे. त्याच्या निर्णयाचे शहराच्या विकासात दूरगामी सकारात्मक परिणाम पहायला मिळतील, असे निरीक्षण जाणकारांनी नोंदवले आहे.




### आयुक्तांची स्वागतार्ह कार्यपद्धती...

प्रशासक राजवट सुरू झाल्यापासून महापालिकेतील नगरसेवकांचा राबता कमी झाला आहे. पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्यामुळे विविध पदाधिकारी आणि सभापतींच्या दालनात होणारी गर्दी कमी होवून आयुक्तांच्या दालनाबाहेर गर्दी जमा झाल्याचे अनेकदा पहायला मिळते. आयुक्त शेखर सिंह आपल्या दालनात मोजक्या लोकांना प्रवेश देतात. ‘ऑन दी स्पॉट’ निर्णय घेतला जातो. त्यासाठी संबंधित अधिकारी आणि विभागप्रमुखांना तात्काळ संपर्क करुन “एक घाव दोन तुकडे” अशा पद्धतीने कामकाज केले जाते, असे काही जाणकार मंडळी सांगतात. याबाबत महापालिकेत एक किस्सा चांगलाच चर्चेत आला होता. “एकदा आयुक्त शेखर सिंह आपल्या दालनामध्ये लोकांच्या समस्या आणि मागणी निवेदने स्विकारुन प्रश्न मार्गी लावत होते. त्यामध्ये एक व्यक्ती स्वत:च्या संस्थेच्या कार्यक्रमासाठी महापालिका क्रीडा विभागाच्या अधिकारातील खेळाचे मैदान भाड्याने मिळावे म्हणून अर्ज घेवून आग्रह करीत होते. याला शांतपणे उत्तर देताना शेखर सिंह म्हणाले होते की, “स्पोर्ट्स ग्राउंड प्रोग्राम के लिए रेंट पर नहीं देने का डिसिजन राजेश पाटील सर ने लिया था और यह निर्णय मुझे सही लगता है... और मैं उसे फॉलो करुंगा... आप को कहीं और जहग कार्यक्रम करना पडेगा..” शेखर सिंह यांचे ही वाक्ये ऐकल्यानंतर उपस्थित अभ्यांगतांच्या लक्षात आले की, आपल्यापेक्षा अनुभवाने वरिष्ठ असलेल्या अधिकाऱ्याचा निर्णय चांगला असेल, तर तो पुढे कायम ठेवला पाहिजे, अशी सकारात्मक भूमिका आणि आदरयुक्त भावना शेखर सिंह ठेवतात. त्यामुळेच महापालिका वर्तुळात त्यांनी स्वतंत आणि आदरयुक्त दरारा निर्माण केला आहे.

### मोशीतील प्रस्तावित मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आरोग्य संजीवनी...

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. शहरासह सभोवतालच्या ग्रामीण भागातून सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) हा आधार आहे. मात्र, या रुग्णालयावरील ताण वाढल्यामुळे शहरात नवीन मोशी येथे तब्बल ८५० बेडचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याच्या कामाला आयुक्त शेखर सिंह यांनी मंजुरी दिली. त्यामुळे वायसीएमवरील ताण कमी होणार असून, शहराची आरोग्य व्यवस्था सक्षम होणार आहे. कोविड काळात आरोग्य व्यवस्था सक्षम होणे किती आवश्यक होते, याचा अंदाज मानवजातीला आला आहे. त्यामुळे भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मोशी रुग्णालय आरोग्य संजीवनी ठरणार आहे. यासारखे अनेक विविध प्रकल्प प्रशासक राजवटीमध्ये मार्गी निश्चितपणे लागतील. कारण, राजकीय हेवे-दाव्यांमध्ये निर्णय घेताना अनेकदा अडचणी येतात. त्या अडचणींचा सामना सध्यातरी आयुक्त शेखर सिंह यांना करावा लागत नाही. त्यामुळे एकहाती निर्णय स्वातंत्र्य असल्यामुळे शेखर सिंह आपली पिंपरी-चिंचवडमधील कारकीर्द गाजवतील, यात शंका नाही.

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## कोस्टल रोडच्या टनेलिंगचे काम महिन्याअखेरीस होणार

। मुंबई महाईन्यूज ।



मुंबईतल्या कोस्टल रोडच्या प्रकल्पाअंतर्गत प्रिन्सेस स्ट्रीट ते वांद्रे वरळी सी लिंक हा टप्पा तयार करण्याचे काम पालिकेकडून सुरू आहे. या प्रकल्पाअंतर्गत दुसऱ्या टनेलचे काम हे महिन्याअखेरीस पूर्ण करण्याचे पालिकेचे उद्दिष्ट आहे.

या कामाअंतर्गत दुसऱ्या दिशेच्या टनेलचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. डाव्या बाजुच्या टनेलचे २०७२ मीटरपैकी १८९२ मीटरचे काम आतापर्यंत पूर्ण करण्यात आले आहे. तर उर्वरीत १८० मीटरचे काम जानेवारी अखेरीस पूर्ण होणे अपेक्षित आहे.

गिरगाव ते प्रियदर्शनी या टप्प्यातील २.०७ किलोमीटरचे टनेलिंगचे काम मावळा टनेलच्या माध्यमातून करण्यात येत आहे. उजव्या आणि डाव्या बाजुच्या दिशेने हे टनेलिंगचे काम अपेक्षित आहे. त्यामध्ये उजव्या बाजुच्या टनेलिंगचे काम याआधीच पूर्ण झाले आहे.

तर डाव्या बाजुच्या टनेलिंगचे काम हे जानेवारी अखेरीपर्यंत होणे अपेक्षित असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. प्रिन्सेस स्ट्रीट ते वांद्रे वरळी सी लिंक कनेक्टिव्हिटीचा १०.५८ किलोमीटरचा हा प्रकल्प आहे. त्यामध्ये टनेलिंगचे काम हे सर्वात महत्वाचे असे काम आहे. पहिल्या उजव्या बाजुच्या टनेलिंगच्या कामात अनेक अडथळ्यांचा सामना करत टनेलिंगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. टनेलिंगच्या कामात मोठ्या प्रमाणात या गिरगाव ते प्रियदर्शनी भागात ब्लॅक बसाल्ट हा दगड सापडला होता. या कामाच्या दरम्यान अनेक आव्हानांचा सामना करत हे पहिल्या टप्प्यातील टनेलिंगचे काम पूर्ण झाले. याच आव्हानांना सामोरे जाण्याचा फायदा आम्हाला दुसऱ्या टप्प्यातील कामात झालेला आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील टनेलिंगच्या तुलनेत आम्ही अधिक वेगाने टनेलिंगचे काम पूर्ण केले असल्याची माहिती त्या अधिकाऱ्याने दिली.

# काँग्रेसचे उमेदवार सुधीर तांबेंची पदवीधर निवडणुकीतून माघार!

## » मुलगा सत्यजीत तांबेंकडून अपक्ष अर्ज दाखल





। मुंबई महाईन्यूज ।

महाविकासआघाडीकडून नाशिक पदवीधर मतदारसंघाची जागा काँग्रेसला देण्यात आली. काँग्रेसनेही डॉ. सुधीर तांबे यांची उमेदवारी घोषित केली. सुधीर तांबे काँग्रेसकडून तीनवेळा या मतदारसंघातून निवडून आले होते. काँग्रेसकडून सुधीर तांबे यांच्याच नावाने एबी फॉर्म आला, मात्र, ऐनवेळी सुधीर तांबेंनी आपली उमेदवारी मागे घेत मुलगा सत्यजीत तांबे यांचा अर्ज दाखल केला. याबाबत स्वतः सुधीर तांबेंनी माहिती दिली. ते गुरुवारी (१२ जानेवारी) नाशिकमध्ये माध्यमांशी बोलत होते.

सुधीर तांबे म्हणाले, "सत्यजीत तांबे राज्यात जे तरुण मुलं नेतृत्व करत आहेत त्यात एक दूरदृष्टी असलेलं युवानेतृत्व आहे. त्यांना वेगवेगळ्या विषयांचं सखोल ज्ञान आहे. त्यामुळे हे या निवडणुकीत हे नेतृत्व द्यावं असं आमचं ठरलं. त्यामुळे आम्ही सत्यजीत तांबे यांचा अर्ज भरला आहे. हा अर्ज महाविकासआघाडीच्या वतीने भरला आहे.""फक्त सत्यजीत तांबे यांचाच अर्ज भरला आहे"

"फक्त सत्यजीत तांबे यांचाच अर्ज भरला आहे. सत्यजीत तांबेंच्या नावाला काँग्रेसमधील काही पक्षश्रेष्ठींनी विरोध केला असं नाही. कोणी विरोध केला असेल असं मला वाटत नाही. कारण आमच्या पक्षाचंही हे धोरण आहे की, तरुण लोक राजकारणात आली पाहिजेत. काँग्रेसने तरुणांना संधी देण्याचं मोठं

### "सर्वच पक्ष सत्यजीत तांबेंना मदत करतील"

**»"सत्यजीत तांबे हे एक चांगलं नेतृत्व आहे. इथं बऱ्याच गोष्टी अशा असतात की, पक्षाच्याही पलिकडे विचार करावा लागतो. सर्वच पक्ष तसा विचार करत असतात. सर्वच पक्ष सत्यजीत तांबेंना मदत करतील अशी आमची अपेक्षा आहे," असंही सुधीर तांबेंनी नमूद केलं.**

# एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन करण्यात अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांची आडकाठी

## » कर्मचारी संघटनेचा आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।

जानेवारी महिन्याची 12 तारीख उलटण्यास काही तासांचा अवधी शिल्लक असला तरी अद्यापही एसटी कर्मचाऱ्यांच्या (ST WORKERS) खात्यात पगाराची रक्कम जमा झाली नाही. पगारासाठी होत असलेल्या विलंबामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराला (ST WORKERS SALARY ISSUE) उशीर होण्यास अर्थ खात्यातील अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप एसटी कर्मचारी काँग्रेसने केला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपात वेतनासाठी चार वर्षे पूर्ण रक्कम देण्याचे तसेच प्रत्येक महिन्याच्या 7 ते 10 तारखे दरम्यान वेतन देण्याचे न्यायालयाने नेमलेल्या त्रि-सदस्यीय समितीने सरकारच्या वतीने न्यायालयात मान्य केले होते. पण जानेवारी महिन्याची 12 तारीख उलटून गेली तरी सरकारकडून निधी न मिळाल्याने कर्मचाऱ्यांना अद्यापही वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी मंत्रालयातील अर्थ खात्यातील अधिकारी हे सरकारला जुमानत नाहीत. किंबहुना एसटी महामंडळाच्या प्रस्तावाला हरताळ फासत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र एस.टी.कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना मागील अनेक वर्षांपासून दर महिन्याच्या 7 तारखेला वेतन मिळायचे. पण या महिन्यात सुद्धा 12 तारखेला देखील वेतन मिळालेले नाही. या विषयावर सरकारचे अर्थ खाते गंभीर नसल्याचे दिसत असल्याचे आरोप बरगे यांनी केला. शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून कर्मचाऱ्यांचा पीएफ, ग्रॅज्यूटी, बँक कर्ज व इतर मिळून 978 कोटी रुपयांची रक्कम थकली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर अवलंबून असलेल्या विविध संस्था अडचणीत सापडल्या आहेत.

4 जानेवारी रोजी 950 कोटी वेतनासाठी मिळावेत असा प्रस्ताव सरकारच्या मंत्रालयातील अर्थ खात्याकडे एसटी महामंडळाने पाठवला होता. त्यावर अर्थ खात्यातील अधिकारी निर्णय घ्यायला तयार नाहीत. मंत्रालयातील अर्थ खात्यातील अधिकारी हे सरकारला जुमानत



### एसटी महामंडळाविरोधात कोर्टात अवमान याचिका?

**» एसटी महामंडळातील मान्यताप्राप्त संघटना असलेली 'एसटी कामगार संघटने'ने परिवहन खात्याचा पदभार सांभाळत असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांच्याविरोधात कोर्टाच्या अवमान याचिकेची नोटीस पाठवली आहे. सरकारकडून कोर्टात दर महिन्याच्या 7 तारखेला कर्मचाऱ्यांना वेतन देण्याचे मान्य केले होते. मात्र, मागील काही महिन्यात सरकारकडून एसटीला दर महिन्याला मिळणारा निधी वेळेवर आणि पूर्ण मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन देताना महामंडळासमोर अडचणी उभ्या राहत असल्याची स्थिती आहे.**

## एकनाथ शिंदे-प्रकाश आंबेडकर यांच्यात अडीच तास खलबतं

। मुंबई । महाईन्यूज ।



वंचित बहुजन आघाडी आणि ठाकरे गटात युतीच्या चर्चा सुरू असतानाच वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे.

बुधवारी रात्री जवळपास अडीच तास या दोघांमध्ये खलबतं सुरू होती, अशी माहिती आहे. या भेटीमुळे आता राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रकाश आंबेडकर यांच्यात बुधवारी रात्री वर्षा निवासस्थानी बैठक पार पडली. दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल अडीच तास बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, यावेळी नेमकी काय चर्चा झाली? याबाबत स्पष्टता नसली, तरी या भेटीनंतर प्रकाश आंबेडकर शिंदे गटाबरोबर जाणार का? अशी चर्चा सध्या रंगू लागली आहे.

### वंचित-शिंदे गटाकडून भेटीबाबत दुजोरा

**» दरम्यान, या भेटीबाबत वंचित बहुजन आघाडी आणि शिंदे गटातून दुजोरा देण्यात आला आहे. प्रकाश आंबेडकरांची मुख्यमंत्र्यांबरोबर झालेली भेटी ही इंदू मिल संदर्भात होती. याचे कोणतेही राजकीय अर्थ काढू नये, अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी एबीपी माझा वृत्तवाहिनीला दिली आहे. तसेच या बैठकीला गुप्त बैठक म्हणता येणार नाही कारण ही वर्षा बंगल्यावर झाली आहे, अशी प्रतिक्रिया शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी दिली आहे. तसेच सर्व पक्षांना घेऊन महाराष्ट्राचा विकास करावा असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे धोरण आहे, असेही ते म्हणाले.**

# शेतकरी पुन्हा उतरणार रस्त्यावर!

## 26 जानेवारीला देशव्यापी आंदोलनावर घेणार निर्णय

।वॉशिंग्टन। महाईन्यूज ।



देशभरातील शेतकरी पुन्हा आपल्या विविध मागण्या, प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी करत आहे. यात संयुक्त किसान मोर्चा पुन्हा अधिक आक्रमक झाला आहे. 26 जानेवारीला संयुक्त किसान मोर्चाने पुन्हा देशव्यापी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान प्रजासत्ताक दिनाच्या आधी म्हणजे 25 जानेवारी रोजी महाराष्ट्रातही या आंदोलनाचे समर्थन करत आंदोलन केले जाईल. तर 26 जानेवारीला पुन्हा शेतकरी आंदोलनाची सुरुवात होईल.

महाराष्ट्रात संयुक्त किसान मोर्चात सहभागी संघटनांची एक महत्त्वाची बैठक पार पडली, या बैठकीत पुन्हा एकदा देशव्यापी मोर्चासंदर्भात निर्णय घेण्यात आला.

यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला दीडपट हमीभाव, देशव्यापी कर्जमुक्ती, जमीन अधिकारी आणि वीज विधेयक अशा प्रश्नांवर आणि काही प्रमुख मागण्यांसाठी संयुक्त किसान मोर्चाने पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यारं उपसले आहे. 26 जानेवारीला हरियाणातील जिंद येथे शेतकऱ्यांची भव्य महापंचायत घेत देशव्यापी आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे. या आंदोलनादरम्यान पुन्हा ट्रॅक्टर रॅली, मोर्चे, निदर्शने आयोजित केली जातील, या आंदोलनात केवळ महाराष्ट्र, पंजाब, हरियाणातीलचं नाही तर देशातील विविध राज्यांतील शेतकरी सहभागी होणार आहेत.

त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे ओला दुष्काळ, पीक विमा योजना, कर्जमाफी योजना, जमीन अधिग्रहण, वनाधिकार, अन्न सुरक्षा, पेंशन, शेतीमालाचे भाव, दूध एफ.आर.पी., यासारखे प्रश्न तीव्र होत आहे. शेतीचा उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे, मिळकत घटत असल्यानं राज्यातील शेतकरी नैराश्याने आत्महत्या करत आहेत. परंतु राज्यातील भाजप-शिंदे सरकार महापुरुषांचा अवमान, धार्मिक द्वेषाचे मुद्दे उपस्थित करून शेती, शेतकरी व श्रमिकांचे प्रश्न बाजूला सारण्यासाठी नियोजनबद्ध कारस्थाने करत असल्याचे अजित नवले म्हणाले.

### राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा

**महाराष्ट्रात खरीप हंगाम वाया गेल्याने आता शेतकरी अडचणीत सापडेल आहे. राज्यात शेतकऱ्यांनी यंदा 1 कोटी 41लाख हेक्टरवर खरीपाची पेरणी केली होती. मात्र गोगलगाईचा प्रार्दुभाव, वाणी आळीचा हल्ला, येलो मोझ्याक, अतिवृष्टी अशा अनेक नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच उभं पिक नष्ट होत आहे. यात काही शिल्लक पिकांवर परतीचा पावसाने हल्ला केला. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार,राज्यात पहिल्याच टप्प्यात 29 लाख हेक्टर पिकं पावसाने खराब झाली. याचा राज्यभरात 40 लाख हेक्टर पिकांना फटका बसला. यामुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करायवा, अशी भूमिका किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी मांडली.**

# पुढची 25 वर्षे राष्ट्र निर्माणाच्या दृष्टीने महत्त्वाची

## पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उद्घाटन

।हुबळी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



पुढची 25 वर्षे राष्ट्र निर्माणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. युवा शक्तीची स्वप्ने आणि आकांक्षा भारताची भविष्यातली दिशा आणि उद्दिष्ट ठरविणार आहेत, आणि युवाशक्तीचा उत्साह देशाचा मार्ग ठरवणार आहे. या युवाशक्तीचा वापर करून घेण्यासाठी आपण विचारांनी आणि आपल्या प्रयत्नांनी तरुण असायला पाहिजे. तरुण असणे म्हणजे अभिनव प्रयत्न करत राहणे. तरुण असणे म्हणजे व्यावहारिक भान असणे. आज जग आपल्याकडे समस्यांवरील उपायांच्या अपेक्षेने बघत असेल, तर त्याचे कारण आहे आपल्या 'अमृत' पिढीचे समर्पण, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, गुरुवारी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कर्नाटकातील हुबळीमध्ये 26व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. स्वामी विवेकानंदांची जयंती म्हणून त्यांचे आदर्श, त्यांची शिकवण आणि देश उभारणीत त्यांचे योगदान याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 12 जानेवारी हा दिवस देशभर राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आयोजित संमेलनाची संकल्पना, 'विकसित युवा-विकसित भारत' अशी असून, देशाच्या सर्व भागातील विविधांगी संस्कृती एका मंचावर आणून 'एक भारत-श्रेष्ठ भारत' हे तत्व अधिक बळकट करण्याचा या महोत्सवाचा उद्देश आहे.

एकवीसाव्या शतकातील हा काळ अतिशय महत्वाचा आहे, कारण आज भारत अफाट लोकसंख्या असलेला तरुण देश आहे. भारताच्या या प्रवासात युवा शक्ती महत्त्वाची ठरणार आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी यांनी, एकीकडे आपण राष्ट्रीय युवा महोत्सव साजरा करतो आहोत, तर दुसरीकडे, देशात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवाचाही उत्साह आहे. त्यामुळे स्वामी विवेकानंदांचाच संदेश उद्धृत करत, "उठा, जागृत व्हा आणि आपले लक्ष्य साध्य होईपर्यंत थांबू नका" असे आवाहन युवकांना केले.

आज भारत पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि आमचे ध्येय आहे पहिल्या तीनमध्ये स्थान मिळवणे. कृषी आणि क्रीडा क्षेत्रात निर्माण होत असलेल्या संधींचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला आणि या क्रांतीचे श्रेय युवा शक्तीला दिले.

तुमच्या टेक-ऑफसाठी धावपट्टी तयार आहे. आज जगभरात भारत आणि तरुणांप्रती मोठा आशावाद आहे. हा आशावाद तुमच्याबद्दल आहे. हा आशावाद तुमच्यामुळेच आहे आणि हा आशावाद तुमच्यासाठी आहे! आजचे शतक हे भारताचे शतक आहे असा आवाज जागतिक पातळीवर उठत आहे. हे तुमचे शतक आहे, भारताच्या तरुणांचे शतक आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

आज देशाचे ध्येय आहे - विकसित भारत, सशक्त भारत! विकसित भारताचे हे स्वप्न पूर्ण होईपर्यंत आपण थांबू शकत नाही देशातील प्रत्येक तरुण हे स्वप्न साकार करेल आणि देशाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

यावेळी कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर, निसिथ प्रामाणिक आणि कर्नाटकातील इतर मंत्री उपस्थित होते.

### कलाकारांना पंतप्रधानांकडून अभिवादन

**कर्नाटकातील हुबळी हा भाग आपली विशिष्ट संस्कृती, परंपरा आणि ज्ञान यासाठी ओळखला जातो, इथल्या नामवंत लेखकांना ज्ञानपीठ पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. या प्रदेशाने देशाला, पंडित कुमार गंधर्व, पंडित बसवराज राजगुरू, पंडित मल्लिकार्जुन मंसूर, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी आणि गंगूबाई हंगल यांच्यासारखे महान गायक-संगीतकारही दिले आहेत, असे सांगत पंतप्रधानांनी या सर्व कलाकारांना अभिवादन केले.**

# महागाईचा दिलासा कायम

## डिसेंबरमध्ये 5.72 टक्क्यांच्या दरासह वर्षातील नीचांक

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



अन्नधान्याच्या किमती कमी झाल्याने सरलेल्या डिसेंबर २०२२ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांकावरील आधारित किरकोळ महागाई दराचा पारा आणखी उतरला. आधीच्या नोव्हेंबर महिन्याच्या ५.८८ टक्क्यांच्या तुलनेत सरलेल्या महिन्यांत ५.७२ टक्क्यांवर उतरल्याने या आघाडीवर येत्या काळात सर्वसामान्यांसह, धोरणकर्त्यांनाही दिलासा अनुभवता येण्याचे संकेत मिळत आहेत.केंद्राच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने गुरुवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या काही महिन्यांत दिसून आलेल्या चढत्या क्रमापासून फारकत घेत किरकोळ महागाई दर डिसेंबरमध्ये रिझर्व्ह बँकेच्या वरच्या सहनशील पातळीपेक्षा खाली येत ५.७२ टक्क्यांपर्यंत खाली आला. ही किरकोळ महागाई दराची वर्षभरातील नीचांकी पातळी आहे. या आधी नोव्हेंबर २०२२ मध्ये किरकोळ महागाई दर ५.८८ टक्के नोंदविण्यात आला होता. त्याआधीच्या वर्षात म्हणजे डिसेंबर २०२१ मध्ये तो ५.६६ टक्के राहिला होता. सलग तिसऱ्या महिन्यात किरकोळ महागाई दरात घसरण झाली आहे. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेसाठी गेल्या वर्षभरापासून महागाई दराचा हा उच्च स्तर डोकेदुखी बनला होता. दोहोंकडून वाढत्या महागाईला लगाम लावण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षात मेपासून आतापर्यंत एकूण २२५ आधार बिंदूंची दरवाढ केली आहे आणि बँकांकडून कर्ज घेणे महाग केले आहे. आता अन्नधान्य मुख्यत: भाज्या व डाळी आणि अन्य चीज वस्तूंच्या किमती उतरल्यामुळे देशातील किरकोळ महागाईच्या दरात सरलेल्या जुलै महिन्यात घट दिसून आली. सरलेल्या महिन्यात अन्नधान्य महागाई दरात घसरण झाली असून नोव्हेंबरमधील ४.६७ टक्क्यांवरून कमी होत ४.१९ टक्क्यांवर आला आहे.

# भर कार्यक्रमात उर्वशी झाली कावरीबावरी

उर्वशी ही तिच्या हटके स्टाईलसाठी नेहमीच चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून ती भारतीय क्रिकेट संघातील स्टार खेळाडू ऋषभ पंतमुळे लाईमलाईटमध्ये आली आहे. आता तर त्या व्हिडिओनं उर्वशीला मोठा धक्काच बसला आहे. त्याची चर्चा सुरु झाली आहे.

उर्वशी ही काही दिवसांत तिच्या आगामी वाल्टेअर वीरय्या नावाच्या चित्रपटामध्ये दिसणार आहे. त्याच्या प्रमोशनसाठी ती विशाखापट्टणमला गेली होती. त्या प्रमोशनल व्हिडिओमध्ये जे काही झाले त्याची चर्चा सुरु झाली आहे. ती बोलायला लागली आणि तेवढ्यात प्रेक्षकांमधून आवाज आला... ऋषभ, ऋषभ. हे सगळं उर्वशीसाठी धक्कादायक होते. व्हायरल व्हिडिओला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

उर्वशी येणार म्हटल्यावर प्रेक्षकांमध्ये तिला ऐकण्याची मोठी उत्सुकता होती. ती काय बोलणार याकडे सगळयांचे लक्षही होते. अशातच प्रेक्षकांमधून मोठ्या चर्चेला सुरुवात झाली. त्यांनी आरडाओरड केली. लोकांनी मोठमोठ्यानं ऋषभच्या नावाच्या घोषणाच दिल्या. त्यामुळे उर्वशीचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. यापूर्वी देखील अशा घटना घडल्या आहेत.

उर्वशीनं तर आश्चर्य व्यक्त केले आहे. तिच्या त्या व्हिडिओवर नेटकऱ्यांच्या भन्नाट प्रतिक्रिया आल्या आहेत. ती म्हणते, चिरंजीवी यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळते आहे याचा आनंद आहे. चिरंजीवी याचा अर्थ आहे अमर...ते त्यांच्या चाहत्यांसाठी अमर आहेत. त्यांना चाहत्यांचे खूप प्रेम मिळते. असं प्रेम की ज्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळते. असं ती म्हणाली आहे.

हेही वाचा:



# 36 गुण जुळणार की 36 चा आकडा.. येतेय भन्नाट मालिका..

सध्या झी मराठी वाहिनी दर्जेदार मालिका घेऊन प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे. काही दिवसांपूर्वीच या वाहिनीने कूस बदलली आणि 'तु चाल पुढं', 'बये दार उघड' सारख्या दर्जेदार मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आणल्या. या मालिका चर्चेत असतानाच झी मराठी वाहिनीने प्रेक्षकांसाठी एक नवीन वर्षाची भेट आणली आहे. लवकरच एक भन्नाट विषय घेऊन ही मालिका प्रक्षेपित होणार आहे.

‘३६ गुणी जोडी’ असे या मालिकेचे (MARATHI SERIAL) नाव असून ह्या नवीन मालिकेचा प्रोमो नुकताच झळकला. आणि थोड्याच कालावधीत या मालिकेची चर्चा होऊ लागली. ‘प्रत्येक जोडी जुळत नसते’ अशी या मालिकेची टॅगलाइन आहे.




ह्या मालिकेतील नायक नायिका विरुद्ध दृष्टिकोन असलेल्या दोन व्यक्ती आहेत. या दोन परस्पर विरोधी आणि एकमेकांच्या नतावर टिचून नडणाऱ्या वेदान्त आणि अमूल्याची जोडी कशी जमणार ही पाहण्यासारखं आहे. वेदांत हा एक सुप्रसिद्ध तरुण, प्रस्थापित उद्योगपती आहे तो स्त्रीपेक्षा पुरुषांच्या सहवासाला प्राधान्य देतो कारण त्याचा असा विश्वास आहे की पुरुष स्त्रीपेक्षा अधिक सक्रिय, कार्यक्षम, तीक्ष्ण आणि मेहनती आहे. तर अमुल्याला डॉक्टर बनण्याची इच्छा असली तरी तिला हिमोफोबिया आहे. ती प्रेमळ, स्वैच्छिक, टॅलेंटेड आणि विनोदी असून ही तिच्या व्यक्तिमत्त्वाची मजबूत बाजू आहे. शशांक सोळंकी यांची निर्मिती असलेल्या या मालिकेचं लेखन अनिल देशमुख यांनी केलं असून, दिग्दर्शन हरीश शिर्के यांचं आहे.

# भूतकाळाची सावली बदलणार भविष्यकाळाची दिशा!

'प्रतिशोध'- झुंज अस्तित्वाची ही मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याची पहिली झलक प्रेक्षकांना पाहायला मिळते आहे. निरनिराळ्या चित्रपटांमधून आणि मालिकांमधून वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणारे अमोल बावडेकर आता एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार आहेत.

'प्रतिशोध' या नव्या कोऱ्या मालिकेतून अमोल बावडेकर तृतीयपंथी आईची भूमिका साकारणार आहे. ममता असे या व्यक्तिरेखेचे नाव आहे. अमोल बावडेकरबरोबरच पायल मेमाणे ही गुणी अभिनेत्रीसुद्धा पाहायला मिळणार आहे. ती ममताच्या मुलीची म्हणजेच दिशाची व्यतिरेखा साकारताना दिसणार आहे.

प्रतिशोध ही मालिका आई आणि मुलगी यांच्या विशिष्ट नात्यावर भाष्य करणारी थरारक मालिका आहे. भूतकाळातील काही विशिष्ट गोष्टींमुळे ममता आणि दिशा यांना यांच्या भविष्यात कोणत्या अडचणींना सामोरं जावं लागणार आहे, हे आपल्याला या मालिकेतून पाहायला मिळेल.

एक आगळंवेगळं कथानक असलेली ही मालिका प्रेक्षकांना येत्या 16 जानेवारीपासून रात्री 10 वाजता पाहायला मिळणार आहे. 'प्रतिशोध' - झुंज अस्तित्वाची ही नव्या पठडीतली मालिका प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेते आहे. या मालिकेत तृतीयपंथी आई आणि दिशा नावाची मुलगी यांचं नातं उलगडणारी आहे आणि त्यांच्या संघर्षाची कहाणीही या मालिकेतून दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे.



नव्या मालिकेतील अमोलची तृतीयपंथीची भूमिका त्याच्यासाठी आव्हानात्मक ठरलेली आहे. अशा धाटणीची भूमिका प्रथमच साकारण्याची संधी मिळाल्याने तो या भूमिका साकारण्यासाठी उत्सुक आहे. मालिकेची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. हे आगळंवेगळं कथानक पाहून प्रेक्षकांनी या मालिकेचं स्वागत केलं आणि अमोलच्या भूमिकेला पसंतीही दर्शवली.

# बॉलिवूडच्या श्रद्धा कपूरला ‘मिसळ’ची भुरळ;

मराठमोळ्या पदार्थानी आज सगळ्यांना वेड लावलं आहे. रितेश देशमुखची पत्नी जिनिलिया देशमुखलादेखील पिठलं भाकरी आवडते. तिच्याप्रमाणेच इतर बॉलिवूडच्या कलाकरांना मराठी पदार्थ आवडतात. स्त्री चित्रपटातून प्रेक्षकांची मन जिंकणारी अभिनेत्री श्रद्धा कपूर अस्सल महाराष्ट्रीय आहे. तिची आई मराठी असून वडील पंजाबी आहेत, मात्र घरात ती अस्खलित मराठीत बोलते.

नुकताच तिने एक फोटो शेअर केला आहे.

नाशिक, ठाणे, पुणे कुठची मिसळ सर्वात उत्तम असा एका सध्या वाद सुरु झाला आहे. अभिषेक बच्चनला देखील ठाण्याच्या मामलेदार मिसळ आवडते. श्रद्धा कपूरनेदेखील मिसळ पावचा आनंद लुटत फोटो शेअर केला आहे, ज्यात ती मिसळ पाव खात आहे, WOW मिसळ पाव असा कॅप्शन दिल आहे. श्रद्धा कपूर मराठी सण साजरे करत असते, तसेच अनेकदा पत्रकार परिषदेत मराठीत संवाद साधत असते.श्रद्धा कपूर ही नेहमीच तिच्या ग्लॅमरस अंदाजामुळे चर्चेत असते. श्रद्धा कपूरची झलक नुकत्याच ‘भेडिया’ चित्रपटातील ‘ठुमकेश्वरी’ या गाण्यात दिसली होती. लवकरच ती आता लव रंजन यांच्या आगामी चित्रपटात झळकणार आहे.



# श्रीलंकेवर भारताचा दणदणीत विजय!

## मालिका घातली खिशात

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कोलकाता येथे खेळवण्यात आलेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात भारताने श्रीलंकेचा 4 विकेट्सनी पराभव करत मालिकेत 2 - 0 अशी विजय आघाडी घेतली. भारताने श्रीलंकेचे 216 धावांचे आव्हान 6 विकेट्सच्या मोबदल्यात पार केले. भारताकडून केएल राहुलने संयमी अर्धशतक (103 चेंडूत नाबाद 64 धावा) करत भारताचा विजय निश्चित केला. भारताकडून हार्दिक पांड्याने देखील 36 धावांचे महत्वपूर्ण योगदान दिले.

### श्रीलंकेने नाणेफेक जिंकली

» श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. श्रीलंका संघात दोन बदल करण्यात आले आहेत. निसंका आणि मधुशानका दुखापतीमुळे खेळू शकणार नाहीयेत.

### भारतीय संघात एक बदल

» भारताने आपल्या संघात एक बदल केला आहे. गेल्या सामन्यात दुखापत झालेल्या युझवेंद्र चहलच्या ऐवजी चायनामन गोलंदाज कुलदीप यादवला संघात स्थान मिळाले आहे.

तत्पूर्वी, भारताने प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेचा 40 षटकात 215 धावात धुव्वा उडवला. भारताकडून मोहम्मद सिराज ने 30 धावात 3 तर कुलदीप यादवने 51 झावाच 3 बळी टिपले. श्रीलंकेकडून पदार्पण करणाऱ्या नुवानिदू फर्नांडोने अर्धशतकी खेळी केली.भारतासाठी श्रीलंकेची वरची फळी फारशी त्रासदायक ठरत नाही. मात्र लंकेची शेपूट भारतीय गोलंदाजांसाठी जड जाते. पहिल्या सामन्याप्रमाणे दुसऱ्या सामन्यात देखील तळातील फलंदाजांनी झुंजारपणा दाखवत श्रीलंकेला 215 धावांपर्यंत पोहचवले.




# पाकिस्तानचा पराभव टीम इंडियाला धक्का!

## भारताचं नंबर 1चं स्थान 'या' संघाने हिसकावलं

। किवी । महाईन्यूज ।

केन विल्यमसनच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंडने बुधवारी रात्री कराची येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानचा 79 धावांनी पराभव केला. न्यूझीलंडने पाकचा पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली.

किवी संघाने या विजयासह विश्वचषक सुपर लीग पॉइंट्स टेबलमध्ये भारताकडून नंबर 1चा स्थान हिसकावून घेतला आहे. विश्वचषक सुपर लीगमध्ये न्यूझीलंडचे आता 140 गुण झाले असून ते यादीत अव्वल स्थानावर पोहोचले आहेत. न्यूझीलंडच्या या यशामुळे भारत आणि पाकिस्तानने प्रत्येकी एक स्थान गमावले आहे. टीम इंडिया 139 गुणांसह दुसऱ्या स्थानावर तर पाकिस्तान 130 गुणांसह तिसऱ्या स्थानावर घसरला आहे.

पॉइंट टेबलमधील इतर संघांबद्दल बोलायचे झाले तर इंग्लंड 125 गुणांसह चौथ्या,




ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश 120 गुणांसह अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या स्थानावर आहेत. या यादीत अफगाणिस्तान 115 गुणांसह 7व्या तर वेस्ट इंडिज 88 गुणांसह 8व्या स्थानावर आहे. सुपर लीगच्या या पॉईंट टेबलमध्ये भारतासह फक्त टॉप 8 टीम्स 2023 च्या वर्ल्ड कपसाठी थेट पात्र ठरणार आहे, तर इतर दोन टीम क्वालिफायर मॅचद्वारे ठरवल्या जातील. या यादीत श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका टॉप 8 च्या बाहेर आहेत, आता हे दोन संघ विश्वचषकापूर्वी कसे पुनरागमन करतात हे पाहावे लागेल.

आयसीसी क्रिकेट विश्वचषक सुपर लीगची ही पहिलीच आवृत्ती आहे. या लीगद्वारे भारताव्यतिरिक्त इतर 7 संघ थेट विश्वचषक 2022 साठी पात्र ठरतील. उर्वरित दोन संघ विश्वचषक पात्रता फेरीतून निवडले जातील. सुपर लीगमध्ये एकूण 13 संघ सहभागी होत आहेत. प्रत्येक संघाला घरच्या मैदानावर 4 आणि बाहेर 4 म्हणजे एकूण 8 मालिका खेळण्याची संधी मिळेल. प्रत्येक मालिकेत एकूण 3 सामने होतील. विजेत्या संघाला 10 गुण मिळतील, बरोबरी/निकाल नसल्यास त्यांना 5 गुण मिळतील.

पाकिस्तान विरुद्ध न्यूझीलंड दुसऱ्या एकदिवसीय सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, किवी संघाने प्रथम फलंदाजी करताना डेव्हॉन कॉनवेच्या शतकाच्या जोरावर यजमानांसमोर 262 धावांचे लक्ष्य ठेवले होते.

## महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धा: नौकानयनातील आठ सुवर्णपदकांसह पुणे पदकतालिकेत आघाडीवर

मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था



ऑलिम्पिकपटू आणि आशियाई सुवर्णपदक विजेत्या दत्तू भोकनळच्या नेतृत्वाखाली पुणे संघाने महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धेत नौकानयनात १५ पैकी आठ सुवर्णपदकांची नोंद करत पदकतालिकेमध्ये आघाडी घेतली. पुण्याच्या खात्यावर ४२ सुवर्ण, ४३ रौप्य आणि ४१ कांस्यपदके आहेत.भोकनळने सिंगल स्कल्समध्ये सुवर्णपदक पटकावले. 'एमआयटी'च्या विद्यार्थांचाही या यशात मोठा वाटा होता. त्यांच्या अनुष्का गर्जे, भाग्यश्री घुले यांनी महिलांच्या विभागात दुहेरीत सुवर्णपदक मिळवले. त्याचबरोबर भाग्यश्री, अनुष्काने वैदेही देवी आणि हर्षिता पाटील यांच्यासह चौघांच्या गटात कांस्यपदक जिंकले. आठ जणांच्या सांघिक प्रकारात त्यांना नेहा बधे, आर्या तुपे, अनामिका आर्या, साक्षी काकडे यांची साथ मिळाली.

वेटलिफ्टगमध्ये कोल्हापूरच्या निकिता कमलाकरने महिलांच्या ५९ किलो वजनी गटात एकूण १८१ किलो वजन उचलून सोनेरी यश मिळवले. डायिव्हगमध्ये सोलापूरच्या ईशा वाघमोडेने ३ मीटर स्प्रिंग बोर्ड प्रकारात सुवर्णपदक पटकावले. पुरुष विभागात मुंबईचा रोहन स्त्रानी सोनेरी यशाचा मानकरी ठरला. वुशू प्रकारात पुण्याच्या तेजस राऊतने सुवर्ण यश संपादन केले. जलतरणात ८०० मीटर फ्री-स्टाईलमध्ये ठाण्याच्या ऋषभ दासने ९ मिनिट ११.५ सेकंदासह सुवर्णपदक मिळवले. १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात मुंबईच्या दीपक पाटीलने बाजी मारली. २०० मीटर बटरफ्लाय शर्यत पुण्याच्या तनिष्क कुदळेने जिंकली. मुंबईच्या हीर शहाने ५० मीटर बॅकस्ट्रोक शर्यतीत सुवर्णपदक मिळवले.